तरुण भारत ▪ मंगळवार १६ फेब्रुवारी २०१६

# इतरांशी चांगले वागा, आनंद आपोआप मिळेल!

## हरिश्चंद्र भिसे यांचे प्रतिपादन : दोडामार्ग येथील हळबे कॉलेजचे निवासी श्रमसंस्कार शिबीर

प्रतिनिधी
दोडामार्ग

सुख आणि आनंद या बाजारात मिळणाऱ्या वस्तू नव्हेत तर त्या मिळविण्यासाठी आपण स्वत: आनंदी राहून इतरांशी चांगले वागावे, म्हणजे आपणाला आपोआप आनंद मिळेल, असे प्रतिपादन कळणे मुक्तद्वार ग्रंथालयाचे संस्थापक हरिश्चंद्र भिसे यांनी केले. ते लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या सात दिवसीय विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, या निवासी शिबिराच्या सात दिवसात मिळणारा आनंद हा अवर्णनीय आहे.

तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी समाजापर्यंत पोहचले पाहिजे, समाजाप्रती विचार केला पाहिजे, ज्ञानाबरोबरच उत्तम आरोग्यही महत्वाचे आहे.

यावेळी स्वयंसेवकांनी मनोगत व्यक्त केले. उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून शुभम गवस व स्वाती फाटक यांचा गौरव करण्यात आला.

व्यासपीठावर कळणे येथील माऊली देवस्थान कमिटी अध्यक्ष सखाराम देसाई, माजी सैनिक श्री. देसाई, प्रा. आर. ए. मोरे, प्रा. डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. सोनम देसाई व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन निकिता गवस, तर आभार पूनम देसाई हिने मानले.